# आंबोली-दोडामार्ग संवर्धन राखीव



कावळेसाद पॉईंट

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली आणि दोडामार्ग वन क्षेत्राचा काही भाग हा १५ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्र शासनाने आंबोली–दोडामार्ग संवर्धन राखीव म्हणून घोषित केला आहे. या संवर्धन राखीवचे क्षेत्र ५६९२.२४ हेक्टर (५६.९२ चौरस किलोमीटर) असून दोडामार्ग तालुक्यातील घोडगेवाडी, मोर्ले, तेरवण मेढा, खडपडे, भेकूर्ली अशा सहा आणि सावंतवाडी तुक्यातील पारपोली, आंबोली, नेने, मसूरे, केगडे, चौकुळ, कुंभवडे अशा सात गावांचा यात समावेश आहे.

समुद्रसपाटीपासून ६९० मीटर (२,२६० फूट) उंचीवर असलेले आंबोली हे महाराष्ट्रातील एक थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. जैवविविधतेने संपन्न असे हे ठिकाण प्रामुख्याने वैविध्यपूर्ण सरिसृप व उभयचरांसाठी प्रसिद्ध आहे. पट्टेरी वाघाचे अस्तित्वही या ठिकाणी सातत्याने आढळून येत आहे. आंबोली आणि दोडामार्ग परिसरात गेल्या काही वर्षात करण्यात आलेल्या अभ्यासातून सरिसृपाच्या अनेक नवीन प्रजातींचा शोध लागलेला आहे. जैवविविधतेच्या दृष्टीने हा परिसर अतिशय संवेदनशील आहे.



मलबार ग्लायडींग फ्रॉग

प्रसिद्ध आंबोली धबधबा ▶





कुझर



आंबोली टोड



पिंक फॉरेस्ट क्रॅब

## जैवविविधता :

येथील वन हे निमसदाहरित प्रकारचे असून येथे जांभा खडकांचे अनेक सडे आहेत. येथील सरासरी पर्जन्यमान १००० मिलीमीटर इतके आहे. त्यामुळे वनस्पतींच्या अनेक प्रजाती येथे आढळून येतात. यातील अनेक वनस्पती या पश्चिम घाट प्रदेशानिष्ठ आहेत. पठारावरच येणारी अतिदुर्मीळ सेरोपेजिया जैनी (कंदीलपुष्प/खरचुडी) ही येथे आढळून येते. नव्हाळी ही देखील येथील पठारावर येणारी वनस्पती आहे. अंजनी, नरक्या, जांभुळ, उंबर हे वृक्ष या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आहेत. डोंगर उतारावर कारवी दिसून येते. ऑर्किड फुलांच्या अनेक दुर्मीळ प्रजाती येथे दिसून येतात.

सरिसृप आणि उभयचरांच्या अभ्यासकांसाठी हे नंदनवन आहे. येथे आढळणाऱ्या सरिसृप आणि उभयचरांच्या अनेक प्रजाती या फक्त पश्चिम घाटातच आढळून येतात. आंबोली टायगर टोड हा फक्त येथील काही पठारांवरच आढळून येतो. याशिवाय मलबार ग्लायडिंग फ्रॉग, रिंकल्ड फ्रॉग, डान्सिंग फ्रॉग, आंबोली बुश फ्रॉग, आंबोली लिपींग फ्रॉग, मिनरवारिया फ्रॉग, देवगांडूळ अशा २५ प्रजातींच्या उभयचरांची नोंद येथून करण्यात आलेली आहे. यापैकी उभयचरांच्या ११ प्रजाती या पश्चिम घाट प्रदेशानिष्ठ आहेत. तर त्यातील ३ प्रजातींची नोंद ही फक्त आंबोली व परिसरातूनच झाली आहे. खैरेचा खापरखवल्या, उडता सोनसर्प, सिलोन मांजऱ्या, हरणटोळ, पोवळा, पट्टेरी पोवळा, घोणस, मलबारी चापडा, अजगर, घोरपड आणि अनेकविध पाली अशा सरिसृपांच्या एकूण ४५ प्रजातींची नोंद करण्यात आलेली आहे. या सरिसृपांपैकी १४ प्रजाती या पश्चिम घाटातच आढळतात.

फुलपाखरांच्या पश्चिम घाट प्रदेशानिष्ठ आणि दुर्मीळ अशा अनेक प्रजातींची नोंद येथून करण्यात आलेली आहे. आंबोली घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या पारपोली गावाला फुलपाखरांचे गांव म्हणून गौरवण्यात आले आहे.

२०० पेक्षा जास्त प्रजातींच्या पक्ष्यांची येथून नोंद करण्यात आलेली आहे. यापैकी ३२ प्रजाती या स्थलांतरीत आहेत. बिबट्या, रानमांजर, रानकुत्री, अस्वल, सांबर, भेकर, गेळा, खवले मांजर, पाणमांजर, उदमांजर, तपकिरी उदमांजर, पट्टेरी मानेचे मुंगूस, शेकरू असे अनेक सस्तन प्राणी येथे दिसून येतात. २०२१ मध्ये वन विभागाने बसवलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये पट्टेरी वाघाचे छायाचित्र मिळवण्यात वन विभागाला यश आले आहे. आंबोली येथे असणाऱ्या हिरण्यकेशी नदीच्या उगमाजवळ व जवळपासच्या ओढ्यांमध्ये नुकत्याच 'शिस्टुरा हिरण्यकेशी' या नवीन प्रजातीच्या माशाची नोंद करण्यात आली.



जैनी खरचुडी



मलबारी चापडा





हिरण्यकेशी मंदिर



शिस्टुरा हिरण्यकेशी

**कसे पोहचाल**
**जवळचे विमानतळ :** कोल्हापूर ११४ किमी, बेळगाव ८१ किमी.
**जवळचे रेल्वे स्टेशन :** सावंतवाडी ३८ किमी.
**रस्त्याने :** आंबोली-सावंतवाडी ३१ किमी,
दोडामार्ग-सावंतवाडी ३८ किमी.

## आंबोली-दोडामार्ग संवर्धन राखीव

